**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३४/२०२६ मधील नि.क्र.१ खालील आदेश**

**श्रीकृष्ण वि. शासन**

CNR No.MHLA060004602026

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार नामे **श्रीकृष्ण लक्ष्मण मद्देवाड** यांनी बी.एन.एस.एस. चे कलम ५०३ प्रमाणे गुन्हयात जप्त टिप्परचा अंतरीम ताबा मिळणेकामी दाखल केला आहे.

२. अर्जातील मजकूर असा की, अहमदपूर पोलीस स्टेशन अंतर्गत गु.र.नं. ९१/२०२६ बी.एन.एस. चे कलम ३०३ (२) ३(५) व १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अन्वये दाखल गुन्हयामध्ये अर्जदाराच्या मालकीचे Tata LPT 2518 6x2 TC EX BS-III कंपनीचे खालील वर्णनाचे टिप्पर वाहन जप्त करण्यात आलेले आहे. त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| रजिस्ट्रेशन नंबर | :- | एमएच-०५-एएम-३०५५ |
| चेसिस नंबर | :- | MAT448059G2D09051 |
| इंजिन नंबर | :- | B591803261D63511094 |

सदर वाहन अर्जदार यांच्या मालकीचे आहे. त्यांनी त्या वाहनाचा वापर भाडयासाठी व दैनंदिन कामासाठी करीत असे. वाहन पोलीस स्टेशनमध्ये पडुन राहिल्यास त्याचे नुकसान होण्याची शक्यता आहे. सबब, त्यांनी वाहनाचा अंतरीम ताबा मिळण्याची विनंती केली आहे.

३. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी अर्जास हरकत घेतलेली असून त्यांच्या म्हणण्याप्रमाणे जप्त वाहन हे गंभीर गुन्ह्याच्या स्वरूपाच्या गुन्हात जप्त केलेले आहे. अर्जदारास वाहनाचा ताबा दिल्यास तो त्याचा वापर अशा प्रकारच्या गुन्ह्यात पुन्हा करण्याची शक्यता आहे. तसेच जप्त वाहनाची संपरीक्षेमध्ये आवश्यकता आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. तपासी अंमलदार यांनी नि.५ खाली म्हणणे दिले आहे. त्यांनी वाहन अर्जदाराच्या ताब्यात देण्याबाबत योग्य ते आदेश पारित करण्याची विनंती केली आहे.

**५.** अर्जदाराने अर्जाच्या पुष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र, आर.सी. बुकची छायांकित प्रत, आधारकार्डची छायांकीत प्रत व प्रथम खबर अहवालाची छायांकीत प्रत अशी कागदपत्रे दाखल केली आहेत. अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन तो वाहन क्र. एमएच-०५-एएम-३०५५ चा मालक असल्याचे स्पष्ट होते. गुन्हयाचे स्वरुप पाहता वाहनाचा ताबा संपरिक्षेदरम्यान अर्जदाराकडे दिल्यास त्याचा परिणाम संपरिक्षेवर होण्याची शक्यता दिसत नाही.

**६.** सदर वाहन पोलीस स्टेशनमध्ये ठेवून त्याचे नुकसान होणार आहे. सदर वाहन अर्जदाराच्या मालकीचे असल्याने अर्जदाराने योग्य तो पुरावा दिलेला आहे. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज काही शर्तीवर व अटींवर मंजूर होणेस पात्र आहे. म्हणून मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज खालील अटी व शर्तीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार यांना अहमदपूर पोलीसांनी गु.र.नं.९१/२०२६ अन्वये बी.एन.एस. चे कलम ३०३ (२) ३(५) व १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अन्वये जप्त Tata LPT 2518 6x2 TC EX BS-III टिप्पर वाहन ज्याचा रजिस्ट्रेशन नंबर एमएच-०५-एएम-३०५५ असा आहे. त्याचा अंतरीम ताबा खालील शर्ती व अटींच्या अधीन राहून देण्यात यावा.

३. अर्जदार यांनी रक्कम रुपये २५,००,०००/- (रुपये पंचवीस लाख रुपये फक्त) चा निरीक्षणग्रह बंधपत्र तपासी अमलदार यांच्याकडे सादर करावे. अर्जदार/आरोपी यांनी सदर वाहनाचे मूळ स्वरुप, रंग बदलू नये अथवा वाहन इतर कोणासही हस्तांतरीत अथवा तबदिली करु नये तसेच या न्यायालयात आवश्यकता वाटल्यास न्यायालयाचे आदेशान्वये जप्त वाहन न्यायालयात हजर ठेवावे.

४. अर्जदार या न्यायालयाने अथवा या न्यायालयाच्या वरिष्ठ न्यायालयाने दिलेल्या निर्देशावरुन उपरोक्त नमुद वाहन हजर करण्यास असमर्थ ठरल्यास रक्कम रुपये २५,००,०००/- (रुपये पंचवीस लाख रुपये फक्त) या न्यायालयात हजर ठेवावे.

५. तपासी अधिकारी यांनी सदर वाहन अर्जदाराच्या ताब्यात देतेवेळी अर्जदाराच्या खर्चाचे

सदर जप्त वाहनाचे फोटो काढावे, फोटोवर अर्जदाराची स्वाक्षरी घ्यावी व पंचनामा करावा. सदर पंचनामा व फोटो न्यायालयात दाखल करावे. तपासी अधिकारी यांनी वाहन अर्जदाराच्या ताब्यात देतेवेळी विमा पॉलीसीची अद्यावत प्रत घ्याण्यात यावी.

६. येणेप्रमाणे यादी देण्यात यावी.

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.03.17 15:33:08 +0530

दिनांक : – १६.०३.२०२६.

**(श्रीमती एस.डी. वडगांवकर)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अहमदपूर.
(कोर्ट क्र.०१)